महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

# सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

# महाराष्ट्र दूरचित्रवाणी संचधारकांवरील चैन-नि-करमणूक व मनोरंजन कर (निरसन) अधिनियम, १९८५

(दिनांक १६ जून २०१५ पर्यंत सुधारित)

# Maharashtra Act No. V of 1985.

## The Maharashtra Luxury-*cum*-Entertainment and Amusement Tax on Holders of Television Sets (Repeal) Act, 1985

(*As modified upto the 16th June 2015*)

❋

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२०१५

[ **किंमत** : रुपये १०-००]

# महाराष्ट्र दूरचित्रवाणी संचधारकांवरील चैन-*नि*-करमणूक व मनोरंजन कर (निरसन) अधिनियम, १९८५

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**

**कलमे.**


१. संक्षिप्त नाव व व्याप्ती. .. .. .. ..

२. सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमंक १९ याचे निरसन. .. .. .. ..

३. कराची रक्कम परत करणे.

४. नियम करण्याचा अधिकार.

५. व्यावृत्ती.

६. अडचणी दूर करण्याचा अधिकार.


(शा.म.मु.) एच ४०२५ (२५२४-११-२०१५)

## सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५[१].

[महाराष्ट्र दूरचित्रवाणी संचधारकांवरील चैन-*नि*-करमणूक व मनोरंजन कर (निरसन) अधिनियम, १९८५]

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " भाग चार, असाधारण दिनांक ४ एप्रिल १९८५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

### महाराष्ट्र दूरचित्रवाणी संचधारकांवरील चैन-नि-करमणूक व मनोरंजन कर अधिनियम, १९८२ याचे निरसन करण्याबाबत अधिनियम

१९८२ चा महा. १९. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र दूरचित्रवाणी संचधारकांवरील चैन-*नि*-करमणूक व मनोरंजन कर अधिनियम, १९८२ याचे निरसन करणे आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या विवक्षित आनुषंगिक बाबीसाठी तरतूद करणे इष्ट व समयोचित आहे असे वाटते, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छत्तिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र दूरचित्रवाणी संचधारकांवरील चैन-*नि*-करमणूक व मनोरंजन कर (निरसन) अधिनियम, १९८५ असे म्हणता येईल.

१९८२ चा महा. १९. सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ यांचे निरसन. **२.** महाराष्ट्र दूरचित्रवाणी संचधारकांवरील चैन-*नि*-करमणूक व मनोरंजन कर अधिनियम, १९८२ हा दिनांक २५ मार्च रोजी व त्या तारखेपासून निरसित होईल.

कराची रक्कम परत करणे. **३.** (१) १ जानेवारी १९८५ रोजी सुरू होणाऱ्या व ३१ डिसेंबर १९८५ रोजी संपणाऱ्या पूर्ण वर्षासाठी किंवा मार्च, १९८५ या महिन्यानंतरच्या त्या वर्षाच्या कोणत्याही भागासाठी ज्या कोणाही दूरचित्रवाणी संचधारकाने दूरचित्रवाणी संचासाठी कराची रक्कम भरली असेल त्याला, १ एप्रिल १९८५ नंतरच्या ज्या कालावधीसाठी त्याने अशा कराची रक्कम भरली असेल त्या प्रत्येक महिन्यासाठी रु. ५ या दराने प्रमाणानुसार कराची रक्कम परत करण्याची मागणी करण्याचा हक्क असले.

(२) दूरचित्रवाणी संचाचा असा धारक याबाबतीत तयार केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा रीतीने व अशा प्राधिकाऱ्याकडे अशी कराची रक्कम परत मिळण्यासाठी अर्ज करील.

नियम करण्याचा अधिकार. **४.** (१) राज्य शासनाला **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून या अधिनियमान्वये नियम करण्याच्या अधिकाराचा वापर करता येईल.

(२) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(३) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल, इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिती अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात तो नियम

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी पहा, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९८५ भाग पाच, पृ.२१२.

अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही. १९०४ चा मुंबई अधिनियम १.

व्यावृत्ती. **५.** अधिनियमाच्या निरसनाच्या प्रभावाच्या संबंधातील, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम ७ चे उपबंध याबाबतीत लागू होतील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार. **६.** या अधिनियमाच्या उपबंधापैकी कोणताही उपबंध अंमलात आणताना कोणतीही अडचण दूर उद्‌भवल्यास राज्य शासनास, प्रसंगपरत्वे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक करण्याचा किंवा इष्ट वाटेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल :

परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश देता येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  पुणे ४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स,
  नागपूर ४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२ ६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद ४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३३१ ४६८, २३३१ ५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर ४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५० ३९५, २६५० ४०२

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**